संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी


वर्ष : ६ वे ● ● अंक : १०८ ● ● बुधवार दि. ०६ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# महाराष्ट्रातली महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर रिक्षा:अमित शाह

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जळगांव : महाराष्ट्रातली महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर रिक्षा आहे असं म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाविकास आघाडीवर कडाडून टीका केली. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह जळगाव दौऱ्यावर आहेत. या ठिकाणी त्यांनी युवकांना संबोधित केलं. २०४७ च्या विकसनशील भारतासाठी मोदींना निवडून द्या असं आवाहनही त्यांनी आज उपस्थितांना केलं.

मी आपल्याशी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीबाबत चर्चा करायला आलो आहे. तरुण मित्रांनो तुम्ही विचार करत असाल की, उमेदवारांना निवडून आणण्यासाठी ही निवडणूक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा निवडून आणण्यासाठी ही निवडणूक आहे. पण या गैरसमजात राहू नका. येणारी निवडणूक ही २०४७ मध्ये आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनवण्यासाठी आहे. २०४७ मध्ये मंचावर खूप कमी लोकं असतील, पण मंचासमोर बसलेले सर्व तरुण सहकारी असतील. ही निवडणूक आपल्यासाठी आहे. ही निवडणूक भारताच्या



तरुणांची आणि भारताच्या भविष्यासाठी आहे. भाजपला मत म्हणजे तरुणांच्या उज्ज्वल भविष्याला मत. भाजपला मत म्हणजे महान भारताच्या रचनेला मत. भाजपला मत म्हणजे मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवणं, असं अमित शाह म्हणाले.

सोनिया गांधी आणि मनमोहन सिंह यांचं सरकार होतं तेव्हा रोज बॉम्बस्फोट व्हायचे. दहशतवादी भारतात येऊन बॉम्बस्फोट करुन पळून जायचे. काहीच प्रत्युत्तर दिलं जायचं नाही. मोदीजी आले उरी आणि पुलवामामध्ये अतिरेक्यांनी हल्ला केला. दहाच दिवसात पाकिस्तानच्या घरात घुसून सर्जिकल स्टाईक आणि एअर स्ट्राईक करुन आतंकवाद्यांना संपवलं, असं शाह म्हणाले. काश्मीर आपला आहे की नाही? काश्मीर भारताचा भाग आहे की नाही? मोदींनी काश्मीरला भारताशी जोडलं. काँग्रेसने कलम ३७० ७० वर्षे लटकवत ठेवलं होतं. असं अमित शाह आपल्या भाषणात म्हणाले.

महाराष्ट्रातली महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर रिक्षा आहे. या रिक्षाची चाकं पंक्चर झाल्याने खिळखिळी झाली आहे. महाराष्ट्राला पंक्चर ऑटो विकास देऊ शकते का? तर नाही. त्यामुळे महाराष्ट्रात शिंदे फडणवीस सरकार महाराष्ट्रात उत्तम काम करतं आहे. असंही अमित शाह म्हणाले.

# ‘मेफेड्रोन’ प्रकरणातील पोलीस उपनिरीक्षक निलंबित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पिंपरी : ४४ किलो ७९० ग्रॅम किलो वजनाचे ४४ कोटी ७९ लाख ८० हजार रुपयांचे मेफेड्रोन अंमली पदार्थासह अटक केलेल्या पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील एका पोलीस उपनिरीक्षकाला निलंबित करण्यात आले आहे. तर, दोन पोलीस कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत.



विकास शेळके

पिंपळेनिलख रक्षक चौकात हॉटेल कामगाराकडून दोन कोटी रूपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ जप्त केल्यानंतर या प्रकरणात निगडी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक विकास शेळके याला अटक करण्यात आली आहे. त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन कोठून आणले याची विचारणा पोलिसांनी केल्यावर नमामीने निगडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक शेळके याचे नाव घेतले. त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. शेळके याचा सहभाग आढळल्याने त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# शस्त्र प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



सांगली : महासंस्कृती महोत्सवामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शस्त्र प्रदर्शनाची पाहणी करताना उपस्थित विद्यार्थी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई व सांगली जिल्हा प्रशासन यांच्यावतीने दि २ ते ६ मार्च या कालावधीत कल्पद्रुम मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या महासंस्कृती महोत्सवामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शस्त्र प्रदर्शनास शहरातील विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली.

मुख्य कार्यक्रम स्थळालगत असेलेल्या प्रदर्शनास हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी भेट देत शस्त्रांची माहिती जाणून घेतली. तलवार भाला, बर्ची, आसूड, तोफगोळे, वाघ नखे, ढाली, दांडपट्टा, शिरस्त्राण, बंदूका, आदींची माहिती शस्त्र संग्राहकार श्री. सावंत यांच्याकडून जाणून घेतली. दालनात ठेवण्यात आलेल्या या शस्त्रांनी भूतकाळामध्ये महाराष्ट्रात घडलेल्या दैदिप्यमान पराक्रमाची साक्ष दिली. उपस्थित विद्यार्थ्यांनी या पराक्रमाला आठवत आणि शस्त्रांची नजाकत डोळ्यात साठवत असे प्रदर्शन राज्यात सर्वत्र व्हावे, अशी इच्छा मनाशी बाळगत या शस्त्र दालनातून आनंदाने मोहरून बाहेर पडली ..!

# जरांगेंची विना परवानगी सभा; गुन्हा दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नांदेड- मराठा आरक्षणाचे आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील हे सोमवारी नांदेडात आले होते. त्यांची रात्री पावणेबारा वाजता चांदोजी पावडे मंगल कार्यालयात जाहिर सभा घेण्यात आली. या सभेला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. तसेच रात्री उशिरापर्यंत ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यात आल्याने या प्रकरणात मनोज जरांगे पाटील आणि आयोजक श्याम वडजे यांच्या विरोधात भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मनोज जरांगे पाटील हे सोमवारी रात्री नांदेडात आले होते. महादेव पिंपळगाव येथे एका लग्न समारंभाला उपस्थितीनंतर रात्री साडे अकरा वाजता ते चांदोजी पावडे मंगल कार्यालयात आले. या ठिकाणी हजारो मराठा समाज बांधव उपस्थित होते. त्यांच्या आगमनावेळी मंगल



कार्यालयाबाहेर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. त्यानंतर जरांगे पाटील यांनी मराठा समाज बांधवांशी संवाद साधला. ही सभा रात्री साडे बारा वाजता संपली.

यावेळी भाग्यनगरच्या पोलिसांनी तिथे धाव घेवून सभेच्या परवानगीबाबत चौकशी केली असता, परवानगी नसल्याचे पुढे आले. त्यामुळे विनापरवानगी सभा घेणे, जिल्हाधिकार्यांच्या जमावबंदीचे आदेशाचे उल्लंघन तसेच रात्री उशिरापर्यंत ध्वनीक्षेपकाचा वापर केल्याच्या कलमाखाली मनोज जरांगे पाटील आणि श्याम वडजे यांच्या विरोधात भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# अनिल देसाईंची गुन्हे शाखेकडून चौकशी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुंबई : ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार अनिल देसाई यांना मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून समन्स बजावण्यात आले होते. यानुसार काल (दि.५) ते मुंबई पोलीस मुख्यालयात चौकशीसाठी हजर राहिले. दरम्यान त्यांची तब्बल आठ तास चौकशी झाली.

शिवसेना पक्षाच्या निधीसंदर्भात शिंदे गटाच्या शिवसेनेने आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत, आर्थिक गुन्हे शाखेने शिवसेना पक्षाच्या निधी खात्यासंदर्भातील चौकशी सुरू केली आहे. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांची शिवसेना ही खरी शिवसेना असल्याचं जाहीर केल्यानंतर पक्षनिधी खात्यातील पन्नास कोटी रुपये काढल्याचा आरोप करत शिवसेना शिंदे गटाने ठाकरेंवर तक्रार दाखल केली होती.

शिंदे शिवसेनेच्या आरोपाबाबत मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अनिल देसाई यांना चौकशीसाठी बोलावले होते. तर त्यांनी मला जे काही विचारलं ते मी त्यांना सांगितलं. मला वाटतं की मी



अनिल देसाई

त्यांना आवश्यक ते सगळं सांगितलं असल्याची प्रतिक्रिया अनिल देसाई यांनी चौकशी नंतर माध्यमांशी बोलताना दिली आहे.

# आटपाडीत आज होणार वाळू लिलाव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यात जप्त करण्यात आलेल्या वाळूचा लिलाव आज दिनांक ०६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार असल्याची माहिती तहसीलदार सागर ढवळे यांनी दिली.

आटपाडी तालुक्यामध्ये चोरून वाळू वाहतूक करण्याऱ्यावर महसूल प्रशासनाच्या भरारी पथकाने धाड टाकत वाळू चोरावर कारवाई केली आहे. यामध्ये चोरून वाळूची वाहतूक व विक्री करणारी वाळू ही आटपाडी तहसीलदार कार्यालयाच्या आवारात आणून ठेवली होती.

आता या जप्त करण्यात आलेल्या वाळूचा लिलाव हा आज दिनांक ०६ रोजी सकाळी ११.०० वा. तहसीलदार कार्यालय या ठिकाणी होणार आहे. तरी जे-जे वाळू घेण्यास इच्छुक असतील त्यांनी उपस्थित राहून या वाळू लिलाव मध्ये सहभाग घ्यावा. तसेच जो सर्वात जास्त बोली लावेल वाळूचा लिलाव देण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार सागर ढवळे यांनी दिली.

# खासगी बसच्या धडकेत गव्याचा मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

गारगोटी: गारगोटी-मुदाळ मार्गावरील कुर येथे कालव्याजवळील रस्त्यावर खासगी बसच्या धडकेत गव्याचा जागीच मृत्यू झाला. आज, मंगळवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली.

याबाबत माहिती अशी की, कूर येथील कालव्याजवळील रस्त्यावर आज पहाटे कोल्हापूरहून गारगोटीकडे येणाऱ्या खासगी बसच्या गवा आडवा आला. गव्याला बसची जोराची धडक बसल्याने गव्याचा जागीच मृत्यू झाला. धडकेत खासगी बसचे मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती वन विभागाला मिळताच अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी गारगोटी येथील रेस्क्यू टीमने वनविभागाला सहकार्य केले. या घटनेचा पंचनामा पशुवैद्यकिय अधिकारी



डॉ.संजय दगडू, वनपाल मारुती डवरी, वनरक्षक व्हि ए बोंडे, एस.एस. चौगले, वनसेवक बजरंग देसाई यांनी केला.

जंगलात आगी लावण्याच्या घटना घडत असल्याने चारा न मिळाल्याने वन्यप्राणी गावाशेजारी असलेल्या उसाच्या शेतीकडे आपला मोर्चा वळवतात. उसाच्या शेतात असलेला मक्का,शाळू खाऊन फस्त करतात. दरवर्षी मार्च महिन्यानंतर अशा घटनेत वाढ होते. या मार्गावर असलेली वाहतूक पाहता जर मोटारसायकलस्वाराला धडक बसली असती तर अनर्थ घडला असता.

# नवीन मजुर संस्था काढण्यास परवानगी द्या, जुन्या मजुर संस्था बंद करा

## इंजि. समाधान पाटील : जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार आमरण उपोषण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : सांगली जिल्हयामध्ये नवीन मजूर संस्था काढण्यास परवानगी मिळावी, अन्यथा जुन्या मजूर संस्था बंद करण्यात यावेत अशी मागणी सुशिक्षित बेरोजगार अभियंते समाधान पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून याबाबत त्यांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

जिल्हामध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे आणि पुढे हि ते वाढत चालले आहेत. त्यामुळे कामासाठी स्पर्धा वाढून एक-एक वर्ष एकही काम मिळत नाही. त्यामुळे सुशिक्षित अभियंत्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

याउलट जिल्ह्यात असणाऱ्या मजूर संस्था या धनदांडग्या लोकांच्या असल्याने नवीन मजूर संस्था काढता येत नाहीत. मोजक्याच मजूर संस्था असल्याने मजुर संस्था चालक यांचे वर्चस्व आहे. काम वाटप होत असताना, सु.बे. अभियंते, खुला व मजूर संस्था असे ३३ टक्के काम वाटप होते. परंतु जिल्ह्यामध्ये सु.बे. अभियंते हे २००० च्या वर गेले आहेत. याउलट मजूर संस्था या मोजक्याच आहेत. त्यामुळे सु.बे. अभियंते यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.



इंजि. समाधान पाटील

सध्या वाढत्या बेरोजगारीवर पर्याय म्हणून सु.बे अभियंत्यांना नवीन मजुर संस्था नोंदणी करून मिळाव्यात. कारण पूर्वीच्याकाळी मजुर संस्था ह्या फक्त मजुरी कामासाठी आणि माती कामासाठी स्थापन करण्यात आलेल्या होत्या. परंतु आता मजूर संस्थेच्या माध्यमातून तांत्रिक कामे केली जात आहेत. परंतु मजुर संस्थेत कोणताही तांत्रिक व तांत्रिक ज्ञान असलेला व्यक्ती काम करत नसल्याने कामाचा दर्जा खालावला जातो.

सध्याच्या काळात मजूर संस्थेवर तांत्रिक कामे टाकणे म्हणजे देशाचे आर्थिक नुकसान आहे. कारण, मजुर संस्था चालकाला काँक्रिट चे ग्रेड, डांबरीकरणाचे प्रमाण, बांधकामातील लहान मोठ्या तांत्रिक बाबी या गोष्टीचे ज्ञान नसते. त्यांच्या जवळ असणाऱ्या कामगारांच्या अनुभवावर ते अवलंबून राहतात. म्हणून मजुर संस्था या अभियंत्यांना मिळवण्यात किंवा पुर्णतः बंद करण्यात याव्यात.

मजुर संस्था बंद केल्याने सर्व कामे स्वतः अभियंता पूर्ण करतील, त्यामुळे कामाचा दर्जा उंचावेल आणि सु.बे. अभियंत्यांना कामे मिळण्यास मदत होईल. त्यांची वाढती बेरोजगारी आणि उपासमार थांबेल. त्यामुळे बेरोजगारांची जाणीव आणि मांडलेले मुद्दे यामधील संलग्नता लक्षात घेऊन मागण्या मान्य करावेत अन्यथा आजपासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा समाधान पाटील यांनी दिला आहे.

# दत्तात्रय कवडे यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी शहरातील प्रसिद्ध किराणा व्यापारी दत्तात्रय उद्धव कवडे यांचे दिनांक ०४ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या दुःखद निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त आहे.



दतात्रय कवडे

आटपाडी शहरातील चौंडेश्वरी पतसंस्थेचे ते संस्थापक व्हा. चेअरमन होते. त्याच बरोबर आटपाडी विणकर सोसायटीचे संचालक होते. माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्री कवडे यांचे ते पती होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी तसेच सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या तिसऱ्या दिवशीचा रक्षाविसर्जन आज दिनांक ०६ रोजी आटपाडी येथील स्मशानभूमीत होणार असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली.

# ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ गुणदान प्रक्रियेत बोगसपणा

**अहमद मुल्ला**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड : महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाने राबवलेल्या ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ उपक्रमाच्या जिल्हा व विभागीय कमिटीने गुणदान करताना बोगसपणा केला असून झालेले गुणदान गोपनीय का ठेवले? याबाबत माण तालुक्यातील शाळा व्यवस्थापनामध्ये उलट सुलट चर्चा रंगलेली आहे.

नुकताच राज्य शिक्षण विभागाने ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ उपक्रम राबवला. तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधून गुणानुक्रम काढण्यात आले. या उपक्रमाचा बक्षीस वितरण समारंभ मुंबई येथे काल मंगळवार ५ मार्च रोजी संपन्न झाले.

या उपक्रमासाठी राज्यात एकूण ६६ कोटी रुपयाचे बक्षीस ठेवलेले आहे. वास्तविक पाहता एवढी मोठी बक्षीसाची रक्कम असताना शाळा मूल्यांकनासाठीची कमिटी, त्यामधील तज्ञ, तपशीलवार मूल्यांकन व त्यासाठी द्यावयाचे गुण याचा पॅरामिटर नक्की करणे गरजेचे होते. मूल्यांकन कमिटी मेंबरला प्रशिक्षण देणे गरजेचे होते. कमिटी गुणदानात एक सारखेपणा राहणे गरजेचे होते. मात्र यापैकी काही झालेले नाही.

मूल्यांकन कमिटीने जिल्हा व विभागीय स्तरावर वरिष्ठ कार्यालयाच्या दबावापोटी प्रचंड वेगाने शाळा भेटी घेऊन बेफिकीरपणे गुणदान केल्याचे स्पष्ट झालेले आहे. पॅरामीटर नुसार गुणदान करणे ही संकल्पना मूल्यांकन कमिटीने बासणात गोंडाळून ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच झालेले गुणदान गोपनीण ठेवल्याने मूल्यांकन कमिटीचा सावळा गोंधळ उघड झाला असून अनेक पात्र शाळेवर गुणदान प्रक्रियेत अन्याय झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. या उपक्रमा अंतर्गतचा महत्त्वाचा घटक म्हणजे स्वच्छता मॉनिटर भाग होय.

स्वच्छता मॉनिटर साठी दहा गुण असताना मूल्यांकन समितीने त्या मधील पात्र अनेक शाळांना एक किंवा दोनच गुण दिलेले आहेत. शाळा गुणदान प्रक्रियेत प्रचंड स्पर्धा असताना स्वच्छता मॉनिटरचे तब्बल दहा गुण मूल्यांकन समितीने मनमानी प्रमाणे या उपक्रमात सहभागी नसणाऱ्या शाळांना बहाल केलेले आहेत. दुसऱ्या बाजूला स्वच्छता मॉनिटर मध्ये आदर्श ठरलेल्या शाळांना दहा पैकी दहा गुण मिळणे गरजेचे असताना दहा पैकी केवळ एक किंवा दोनच गुण दिलेले असल्याने या शाळा वर प्रचंड अन्याय झालेला आहे.

गुणदान करताना मूल्यांकन समितीला स्वच्छता मॉनिटर उपक्रम व त्यासाठीचे गुण देण्याबाबतची माहिती नसल्यामुळे गुणदान प्रक्रियेत प्रचंड मोठी तफावत झालेली आहे. त्यातच जिल्हा व विभागीय कमिटीने गुणदान प्रक्रिया गोपणीय ठेवल्याने गैरव्यवहाराचा संशय वाढला असून त्यांच्यावर कोणाचा दबाव होता का? याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

राज्य शालेय विभागाने मोठ्या प्रमाणात बक्षीस रक्कम ठेवलेली असताना तसेच शाळा तपासणी पॅरामीटर संख्या ३० वर असताना मूल्यांकनाचा स्पष्ट ढाचा करणे गरजेचे होते. गुणदानातील गैर व्यवहार टाळण्यासाठी मूल्यांकन कमिटीला ट्रेनिंग देणे गरजेचे होते. मात्र तसे काहीही न करता गडबडीने मूळ मुद्द्याला बाजूला ठेवून जिल्हा व विभागीय कमिटीने संशयास्पद गुणदान केल्याने पात्र शाळावर प्रचंड अन्याय झाल्याचे दिसून येत आहे.

## * संपादकीय *

# लोकप्रतिनिधी नंतर माजी न्यायमूर्ती भाजपमध्ये !

देशातील सत्ताधारी पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टी मध्ये सध्या जोरदार पक्ष प्रवेश होत आहेत. यामध्ये मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यापासून ते आमदार, खासदार, माजी आमदार, खासदार यांच्यासह दुसऱ्या फळीतील नेत्यांचा देखील यामध्ये समावेश आहे. तसेच भारतीय प्रशासना सेवातील अधिकारी यांनी देखील आपल्या पदाचा राजीनामा देवून भाजप मध्ये प्रवेश केला असल्याचे सर्वांना माहितच आहे. परंतु कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभिजीत गंगोपाध्याय यांनी सेवेमध्ये असताना राजीनामा देवून त्यांनी भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या या भाजप प्रवेशामुळे सध्या जोरदार चर्चा होत असली तरी, लोकशाहीसाठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल.

कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभिजीत गंगोपाध्याय चर्चेत आले होते. त्यांच्या राजीनाम्यामागे राजकीय कारण असल्याची चर्चा कोलकात्यामध्ये रंगली होती. त्यातच आपण राजकारणात जाण्याचा विचार करत असल्याचे सूतोवाचही गंगोपाध्याय यांनी दिले होते. त्यानुसार कोलकाता उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदाचा राजीनामा दिल्यानंतर अवघ्या काही तासांत त्यांनी भाजपामध्ये जात असल्याचं जाहीर केले.

माजी न्यायमूर्ती अभिजीत गंगोपाध्याय यांनी मंगळवारी त्यांचा राजीनामा देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पाठवला. तसेच, त्याची एक प्रत देशाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड व एक प्रत कोलकाता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती टी. एस. शिवग्नानम यांच्याकडे पाठवली. यानंतर त्यांनी सॉल्ट लेक परिसरातील त्यांच्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत आपली पुढील राजकीय भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलताना ते म्हणाले, मी भाजपामध्ये प्रवेश करणार आहे. हा पक्षप्रवेश बहुधा येत्या ७ मार्च रोजी होईल. तृणमूल काँग्रेसच्या भ्रष्टाचाराविरोधात लढणारा भाजप हा एकमेव पक्ष आहे. पण आगामी लोकसभा निवडणूक मी लढवेन की नाही, यावर पक्ष निर्णय घेईल, असं ते म्हणाले असले तरी, प. बंगाल मध्ये तृणमूल काँग्रेसच्या विरोधात लढण्यासाठी भाजप मध्ये लायक लोक नाहीत का? असा देखील याचा अर्थ होतो. भाजपा प्रवेशाची घोषणा केल्यानंतर अभिजीत गंगोपाध्याय यांनी पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर आगपाखड केली. मला हे पाऊल उचलण्यासाठी भाग पाडलं गेलं. सत्ताधारी पक्षाकडून वारंवार मारल्या जाणाऱ्या टोमण्यांमुळे मी हा निर्णय घेतला. त्यांच्या विधानांमुळे मला हे पाऊल उचलण्याची प्रेरणा मिळाली. सत्ताधारी पक्षाने अनेक वेळा माझा अवमान केला आहे. त्यांच्या प्रवक्त्यांनी असंसदीय शब्द उच्चारून माझ्यावर हल्ला केला आहे. मला वाटतं त्यांची शिक्षणाची मोठी समस्या आहे, अशा शब्दांत गंगोपाध्याय यांनी तृणमूलवर टीका करत प्रसिद्धी मिळविण्यासाठी ते केविलवाणी प्रयत्न करत आहेत. मला अनेकदा सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून जनतेमध्ये उतरून निवडणूक लढवण्याचं आव्हान दिलं गेलं आहे. त्यामुळे त्यांची इच्छा पूर्ण करण्याचा मी विचार केला, असा टोलाही गंगोपाध्याय यांनी यावेळी लगावला असला तरी भाजप त्यांना निवडणुकीमध्ये उतरवते का? त्यांचा बळीचा बकरा बनविला जातो हे अभिजीत गंगोपाध्याय यांनाच माहित.

खरे ते अभिजीत गंगोपाध्याय उच्च न्यालयात न्यायमूर्ती म्हणून काम करत असताना त्यांची कारकिर्दी वादग्रस्त राहिली आहे. त्यांनी अनेक वाद स्वत:हून ओढावून घेतले आहेत.यामध्ये मोठ्या खंडपीठाच्या आदेशांकडे दुर्लक्ष करणे, परवानगी न घेता वृत्तवाहिनीला मुलाखत देणे, थेट सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीलाच आदेश देणे अशा प्रकारच्या गोष्टींमुळे गंगोपाध्याय वादातही सापडले होते. असो अभिजीत गंगोपाध्याय यांना भाजप प्रवेश केल्यावर पक्ष कोणती जबाबदारी देतो? त्यांचा राजकारणासाठी कसा उपयोग होतो?, हे पाहणे महत्वाचे असून जर, न्यामूर्ती पदाचा राजीनामा देवून अभिजीत गंगोपाध्याय यांच्या सारखी माणसे राजकारणात येत असली तरी लोकशाहीची व्याख्या नक्कीच पायदळी तुडवली जाणार.

# जहाँबाज, मर्दानी माऊली, गोमेवाडीच्या वैजयंतीकाकी देशपांडे

गोमेवाडी म्हंटले की आटपाडी तालुक्यातील उच्चभ्रु ब्राम्हण समाजाचे ऐतिहासीक वारशाचे आघाडीवरचे मुख्य गांव. संत श्री गोंदावलेकर महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या गावाने संत एकनाथ महाराजांच्या एकनाथ षष्ठीचा सप्ताह साजरा करण्याची परंपरा एखादा दुसरा अपवाद वगळता दीड शतकापासून अखंड जपलेली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषविलेल्या ना. सं. इनामदार यांचे जन्मगाव गोमेवाडी आणि याच गोमेवाडीचे जत मधून दोन वेळची आलेली संधी नाकारणारे आणि दोन वेळा संधीचे सोने करीत आमदार म्हणून निवडून गेलेले डव्होकेट जयंत सोहनी साहेब. असा समृद्ध वारसा लाभलेल्या गोमेवाडीमध्येच मी एक जहाँबाज मर्दानी माऊली जवळून पाहिली, अनेक वर्षाच्या हितसंबधातून परिपूर्ण अभ्यासली, जाणली, ती माऊली म्हणजे गोमेवाडीचे माजी सरपंच विलासराव तथा पांडुरंग रंगनाथ देशपांडे यांच्या धर्मपत्नी, कठोर परिश्रमाने उच्चस्तरी पोहचलेले पोलीस अधिकारी राहूल देशपांडे, गावीच राहून शेतकरी धर्म निभावणारे निलेश देशपांडे आणि आई सारख्याच तडफदार, जिद्दी, सर्वांविषयी श्रध्दा, सदिच्छा, सदभावना, आस्था बाळगणाऱ्या, समाजातल्या दांभिकतेवर प्रहार करीत सच्चाईसाठी तीळतीळ तुटणाऱ्या सुनेत्रा देशपांडे-कुलकर्णी या त्रिकुटाच्या प्राणप्रिय मातोश्री वैजयंतीकाकी तथा रजनीकाकी देशपांडे या होत. आज शनिवार दि. २ मार्च रोजी पहाटे ही माऊली अनंतात विलीन झाली.

१९९६ साल असावे. यावर्षी पी. आर. काका आणि वैजयंतीकाकी देशपांडे या दांम्पत्याचा आणि माझा परिचय झालेला. १९८४ पासून पत्रकारीता करीत असल्याने तालुक्यातील सर्व गावे, वाड्या, वस्त्या अगदी ओढे, नाले, डोंगर, दऱ्या, वगळी, खोरे, कुरणे इत्यादींचा माझा परिपूर्ण अभ्यास झालेला. कित्येक गावात, विविध कार्यक्रम, उपक्रम अन्य माहितीसाठी दहा दहा वेळा जाण्याचा मला योग आलेला. त्यामुळे तालुक्याची खडान खडा माहीती. प्रत्येक गावातली चार चौघात वावरणारी, पुढे पुढे करणारी राजकीय, सामाजीक, साहित्यीक, सांस्कृतीक, कला, क्रीडा चळवळीतली माणसे तशी परिचयाची झालेली. अशा एका प्रसंगातून हे गोमेवाडीकर दांम्पत्य माझ्याशी जोडले गेले. काकांचा स्वभाव चार चौघां सारखा शांत, संयमी, सुस्वभावी, सोज्वळ ब्रम्हवृंदा सारखा. याउलट वैजयंती काकींचे स्वभाव वैशिष्ट्य. नवख्या गोलंदाजांने, कसलेल्या मातब्बर फलंदाजाची पहिल्या चेंडूवर तिन्ही दांड्या चक्क मोडून काढत विकेट काढावी किंवा जगभर नावाजलेल्या गोलंदाजाच्या पहिल्याच चेंडूवर नवख्या फलंदाजाने स्टेडियमच्या बाहेर धाडणारा षटकार ठोकावा. अगदी त्याच धर्तीचे काकींचे बोलणे, वागणे, चालणे होते. अहंकारी, मस्तवाल पुरुषानेही



क्षणात शरण यावे, अशा भारदस्त, आक्रमक शब्दफेकीच्या काकींच्या धडाडण्यातून, हे रांगडे पुरुष जागीच क्षणातच चित व्हायचे. भल्या भल्या भांडकुदळ माय माऊल्या क्षणात गरीब माय होताना अनेक वेळा अनुभवास

**सादिक खाटीक**
**आटपाडी जि. सांगली.**
**प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष ओबीसी विभाग महाराष्ट्र**
**मो.नं. ९६६५७५३२९१, ९१६८१६६०५९**

आलेल्या. गरीब, असहाय्य, अगतिक, उपेक्षित, वंचित, मागास, बहुजन, सरळ, सन्मार्गी,सत्शील, माता-भगिनी- पुरुषांसाठी नेहमीच माऊलीच्या प्रेमळ मायेचाच प्रत्यय वर्षानुवर्षे काकी-काकांनी सर्वांना दिला. परिवाराचे जेमतेम उत्पन्न, मुला-लेकरांचे संगोपन, शिक्षण, पै-पाहुणा, सण-वार -उत्सव, आजार-पाजार, सुख-दुःख या सर्वांशी सामोरे जाताना या परिवाराची ससेहोलपट व्हायची. तथापि दारी आलेला प्रत्येक जण, मग तो मुस्लीम असो, मागास, दलित, गरीब उपेक्षित असो, अगदी पालावरचा मागतकरी असो अथवा संपन्न घरातला उच्चभ्रु असो. तो देवघरातल्या पाटावर बसून दोन घास जेवून गेलाच पाहीजे. असा दंडक असणाऱ्या काकी-काकांच्या घरी चहा, दुध, ताक, दही यापैकी काही घेतल्या शिवाय दारी येणारा जातच नसे. कित्येक वेळा भुईमुगाच्या शेंगा, गाजरे, पेरू, काकडी, ज्वारीचा हुरडा, मक्याची कणसे, उस, काकवी, दुभत्या जनावरांच्या चिकाच्या वड्या इतर फळ फळावळाच्या मेजवाणीचा शेकडोंनी लाभ घेतला असेल. इतके विशाल मन, अंतःकरण असणारी ही माऊली मात्र बोलण्या-चालण्यावरून फणस-अननस-नारळासारखी वरून टणक, खरबरीत काटेरी भासे. तथापि अंतरीच्या गोड मधाळ स्वभावाने या माऊलीने नेहमीच आईच्या ममतेचे निरागस, निस्पृह आणि निष्पाप प्रेमच दिले.

कोणत्याही, कसल्याही प्रसंगात सर्वात पुढे ठाकणारी, अन्यायकर्त्या, कर्मचारी, अधिकारी, पुढाऱ्यांवर तुटून पडणारी, काकी नावचे हे जबरदस्त प्रस्थ, गोमेवाडी, करगणी, नेलकरंजी परिसरात सर्वांना परिचित. नेमक्या, शेलक्या, निबरढोक, शब्दांचा अफाट संग्रह असणाऱ्या या माऊलीने ही शब्दांची अस्त्रे-शस्त्रे, दांभीक, चांबाट, आडदांड, मस्तवाल, हेकेखोरे, दुसऱ्यांना अपमानीत करणारांवरच, बेछुट चालविली. परिणाम काय होईल, हे अस्त्र कुठवर लागेल, यातून माणसे तुटतील, याची कधीच तमा न बाळगणाऱ्या या माऊलीकडे पाहिल्यास, त्या उच्चभ्रु, खानदाणी, ब्रम्हवृंद कुटुंबातीलच आहेत का ? असा संभ्रम निर्माण व्हावा, इतक्या परखड, सडेतोड त्या वागत. समोरून काकी येताना दिसताच अनेक नाठाळ आपला मार्ग बदलून धुम ठोकीत. गोमेवाडीतल्या कदमवस्ती लगतच्या देशपांडेमळा ते करगणी असा पाच किलोमीटरचा ओबडधोबड रस्ता, अनेक वर्षे पायपीट करून भल्या मोठ्या ओझ्याचा बाजार डोक्यावर आणणाऱ्या याच काकी होत्या, हे सांगूनही अनेकांचा त्यावर विश्वास बसणार नाही. जवळ जवळ ६ फुटी उंची, धिप्पाड, भारदस्त, वजनदार शरीरयष्टी, भेदक, तीक्ष्ण, करारी नजर लाभलेल्या काकींना पाहताक्षणी अनेकांना धडकी भरत असे. अशा बहुआयामी व्यक्तीमत्वाच्या काकी, प्रत्येक सण-वार-उत्सव, साजरा करताना, त्या त्या उपक्रमात स्वतःला झोकून देवून पाण्यासारख्या मिसळून जात. मग ते गावच्या षष्ठीचा उत्सव असो किंवा श्रीराम मंदिरातले उपक्रम असोत किंवा गावातले सुख दुःखाचे प्रसंग असोत. प्रत्येक ठिकाणी काकी-काका हे दांम्पत्य सर्वाआधी हजर असे. कित्येक गरीबाच्या चुली पेटत्या करण्यात या दांम्पत्याने दिलेले पडद्याआडचे दान अनेकांना आजही स्मरते आहे. उपेक्षितांच्या मुला लेंकरांच्या शिक्षण, सण, वार, उत्सव, लग्न वगैरे प्रसंगी हे दांम्पत्य नेहमीचा मदतीचा हात पुढे करी. अशा नेक, मातृवत्सल स्वभावाच्या या दांम्पत्याने आणि विशेषतः काकी नावच्या या अजब अवलिया माऊलीने, आयुष्यभर केलेले कार्य शेकडोंनो नेहमीच स्मरत राहील. प्रेरणा देत राहील, एवढे मात्र निश्चित. रक्त गट मॅच होणाऱ्या कोणत्याही जाती-जमाती-धर्माच्या रुग्णांना रक्त देता-घेताना त्यांची जात-धर्म-रंग-रूप-गरीब-श्रीमंत असे भेद जसे आडवे येत नाहीत. तशाच श्रध्दा, भावनेने, त्याच न्यायाने सर्वांसाठी, समन्यायाने, माणूसकीने, वावरलेल्या काकी काकांचे वेगळेपण नेहमीच उठून दिसते. सामान्य स्तरावरील एखादे कुटूंब इतके प्रचंड लोकाभिमुख कार्य करू शकते, आपला विशाल परिवार, उच्चभ्रु समाज, भाव-भावकी, आप्त, स्वकीय काय म्हणतील, याचा तीळ मात्र लवलेश अथवा तमा न बाळगता सर्व जाती, धर्माच्या समाजातल्या, सर्व घटकांना, सर्व व्यवस्थांना एकत्रित बांधून त्यांच्यासाठी समर्पित झालेल्या वैजयंतीकाकी आणि पी. आर. काका हे खऱ्या अर्थाने माणूसकीचा-इन्सानियतचा धर्म पाळणारे सच्चे जोडपे आहेत, हे वास्तव त्यांचे विरोधकही नाकारणार नाहीत. हेच खरे. या ध्येयवेडया माऊलीच्या पवित्र आत्म्यास कोटी कोटी प्रणाम, दुवाँ, सलाम, नमस्ते. भावपूर्ण श्रद्धांजली, विनम्र अभिवादन.

# आम्ही म्हणतोय जगवायचं, ह्यो म्हणतोय तोडायचं! पर्यावरण प्रेमींची निदर्शने

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा : दुकानांचे नामफलक दिसत नाहीत म्हणून दीड दशके वाढलेली झाडे तोडण्याचा उद्योग राजपथावरील काही व्यापाऱ्यांनी सुरू केला आहे. यावर आळा बसविण्यासाठी साताऱ्यातील पर्यावरण प्रेमींनी मंगळवारी निदर्शेने करत पालिका प्रशासनाचे या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधले. झाडे मारणाऱ्या या वृत्तीला कायदेशीर मार्गाने उत्तर द्यावे लागेल, असे आश्वासन पालिका प्रशासनाच्यावतीने आंदोलकांना देण्यात आले.

सातारा शहरातील राजपथावर विविध सामाजिक संघटना, संस्था, नवरात्रोत्सव आणि गणेश मंडळांच्या सहकार्याने झाडे लावुन त्यांना जगविण्यात आले. पंधरा फुटांपेक्षा उंच झालेल्या या झाडांनी राजपथाच्या सौंदर्यात भर टाकली. पण व्यापाराच्या निमित्ताने राजपथावर येणाऱ्या काही व्यावसायिकांना हे झाड म्हणजे शापीत सौंदर्य भासत आहे. त्यामुळे ते झाड जाळून मारण्याचे प्रकार सुरू करण्यात आले. या प्रवृत्तींना वेळोवेळी पर्यावरणप्रेमींनी हटकले आहे. पण नव्याने सुरू होणाऱ्या दुकानासमोर झाड तोडण्याच्या हालचाली दिसल्यानंतर पर्यावरणप्रेमी आक्रमक झाले. लोकशाही मार्गाने आंदोलन करून त्यांनी हे झाड तोडले जाऊ नये यासाठी पालिका प्रशासनाची भेटही घेतली. यावेळी राजपथावरील कोणत्याही झाडाला धक्का लागु देणार नाही असे आश्वासन देण्यात आले.

या आंदोलनासाठी हरित सातारा ग्रुपचे कन्हैय्याला राजपुरोहित, अमोल कोडक, प्रकाश खटावकर, महेंद्र बाचल, उमेश खंडूझोडे, निखील घोरपडे, भालचंद्र गोताड, मानद वन्यजीवरक्षक सुनील भोइटे, असिफ खान, ड्रोंगोचे सुधीर सुकाळे, विकास बहुलेकर, अनिकेत जगताप, इंद्रजीत इंदलकर, माजी जिल्हा परिषद सदस्या अर्चना देशमुख, जगन्नाथ कवळे, विनायक माटल, सुरेश झेपले आदी उपस्थित होते.

**फलकांवरचा मजकुर भावला**

झाड वाचविण्यासाठी राजपथावर एकत्र आलेल्या पर्यावरणप्रेमींनी साताकरांचे लक्ष वेधून घेतले. 'आम्ही म्हणतोय वाचवायचं... तर ह्यो म्हणतोय तोडायचं', 'व्यापार करा झाड तोडायचा उद्योग नको', 'प्रत्येक झाड मोलाचं', 'श्वास हवा तर ध्यास हवा', 'एकच ध्यास स्वच्छ श्वास' असे फलक घेऊन उभे असणाऱ्या पर्यावरणप्रेमी नागरिकांच्या हातातील बोर्डवरील मजुकर सातारकरांना भावला.

# सांगलीत दोन पिस्तुले जप्त, दोघांना अटक

## संजयनगर पोलिसांची औद्योगिक वसाहतीत कारवाई

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : औद्योगिक वसाहतीतील बसथांब्याजवळ संशयास्पदरित्या थांबलेल्या सुरज गणपत चव्हाण (वय २६, रा. रेठरे बुद्रुक, रेठरे कारखान्यानजीक ता. कराड, जि. सातारा ) आणि मंथन मोहन गायकवाड (वय २२ रा. हडपसर, गोपाळ पट्टी पुणे, ता. हवेली, जि. पुणे ) यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन पिस्तुल, ६० हजाराचा महागडा मोबाईल असा १ लाख ६६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, संजयनगर पोलिस ठाण्यातील कर्मचारी आकाश गायकवाड यांना खबऱ्यांमार्फत दोघे युवक ज्युबिली कारखाना ते आरटीओ कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील बस थांब्यावर संशययास्पदरित्या थांबले असल्याची माहिती मिळाली. संजयनगर ठाण्याचे निरिक्षक बयाजीराव कुरळे यांना याबाबत माहिती दिली. परिसरात सापळा रचून पथकाने संशयित दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील बॅगची तपासणी केली असता दोघांकडे ५० हजार रुपयाचे किंमतीची देशी बनावटीचे पिस्तुल, दोन जीवंत काडतुसे, ६० हजार रुपये किंमतीचा मोबाईल, ६ हजार रुपयांचा मोबाईल आणि बॅग असा मुद्देमाल मिळून आला.

पिस्तुलासंदर्भात दोघांकडे विचारणा केली असता त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यांच्याकडे शस्त्र परवाना देखील नसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दोघा संशयितांना शस्त्र अधिनियम कलम ३ अन्वये अटक केली आहे. निरीक्षक कुरळे, कर्मचारी कपिल साळुंखे, दिपक गायकवाड, विनोद साळुंखे, संतोष पुजारी, आकाश गायकवाड यांच्या पथकाने कारवाई केली. पोलिस उपनिरिक्षक डी. आर. सय्यद तपास करीत आहेत.

# 'गडहिंग्लज जनता दल' कोणत्या वाटेने ?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

गडहिंग्लज : धर्मनिरपेक्ष जनता दलाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दिवंगत माजी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या पश्चात गडहिंग्लज विभागातील कार्यकर्त्यांचा पहिलाच मेळावा आज, मंगळवारी होत आहे. त्यामुळे 'गडहिंग्लज'चा जनता दल देवेगौडांच्या की शिंदेंच्या वाटेने जाणार? याची उत्सुकता कोल्हापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राला आहे.

गेल्या तीन दशकात महाराष्ट्रासह देशातील राजकारणात अनेक उलथापालथी झाल्या. एकेकाळी देशात आणि राज्यातील सत्तेत भागीदार असलेल्या जनता दलाचीही अनेक छकले झाली. परंतु, माजी पंतप्रधान देवेगौडा यांनी कर्नाटकात आणि महाराष्ट्रात केवळ शिंदेनी आपल्या तालुक्यात अस्तित्व टिकवले.

'समाजवादी पक्ष ते जनता दल' वाटचालीत शिंदे अखेरपर्यंत पक्षाशी



एकनिष्ठ राहिले. म्हणूनच कोल्हापूर जिल्हयासह राज्याच्या राजकारणात त्यांचे नाव चर्चेत राहिले. देशात-राज्यात पक्षाची कुठेही सत्ता नसतानाही त्यांनी गडहिंग्लज नगरपालिका व कारखान्यावरील वर्चस्व कायम राखले. त्यामुळे चंदगड व कागल मतदारसंघात त्यांची भूमिका निर्णायक राहिली.

शिंदेंच्या कन्या माजी नगराध्यक्षा स्वाती कोरी यांनीही वडीलांचा विचार आणि वारसा पुढे चालवण्याचा इरादा शोकसभेतच स्पष्ट केला आहे. दरम्यान,कार्यकर्त्यांनी पक्षनेतृत्वाची धुरा त्यांच्याकडेच सोपवल्यामुळे त्यांच्या भूमिकेवरच येथील वाटचाल अवलंबून आहे.

दरम्यान,माजी पंतप्रधान देवेगौडा,त्यांचे सुपुत्र माजी मुख्यमंत्री कुमारस्वामी यांनी घेतलेला भाजपप्रणित आघाडीबरोबर जाण्याचा निर्णय महाराष्ट्रातील अनेक कार्यकर्त्यांना रूचलेला नाही. त्यामुळे कांहीजण आमदार अबु आझमी यांच्या समाजवादी पक्षात गेले. परंतु, शिंदेंनी घडवलेल्या कार्यकर्त्यांच्या खांद्यावर अजूनही 'मोळीवाल्या बाई'चीच पताका आहे. गडहिंग्लज शहरात राष्ट्रवादी हाच जनता दलाचा पारंपरिक राजकीय शत्रू आहे. अलिकडेच तीन प्रमुख माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादीत जावून मुश्रीफांच्या नेतृत्वाखाली काम सुरू केले आहे. त्यामुळे 'तिथे' अजिबात जाणार नाही,असे स्वाती कोरींनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. परंतु,देवगौडांच्या वाटेने गेल्यास त्या तिथेच पोहचणार आहेत.

स्वाती कोरींच्याकडे नगरपालिका, कारखाना, कुक्कुटपालन, तंत्रनिकेतनमधील कामाचा अनुभव, संघटन कौशल्य, वक्तृत्व कला आहे.त्यामुळे येत्या विधानसभेला कागल व चंदगड दोन्ही मतदारसंघात त्यांना उमेदवारीची आहे.परंतु, त्यासाठी 'इंडिया आघाडी' हाच चांगला पर्याय असून लोकसभा निवडणुकीतच निर्णय घ्यावा लागणार आहे. लोकांचे प्रश्न सत्तेमुळे नव्हे तर संघर्षातूनच सुटतात,यावरच शिंदेंचा ठाम विश्वास होता.त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या अमिषाला बळी न पडता ते अखेरपर्यंत रस्त्यावरची लढाई लढत राहिले.धर्मांध व जातीयवादी शक्तींशी कधीच हातमिळवणी केली नाही.त्यांचा हाच विचार लोकांचे मनोबल वाढवणारा आणि पक्षाला उभारी देणारा आहे.त्याचे भान ठेवूनच निर्णय व्हावा, अशी सर्वसामान्य कार्यकर्त्यांची भावना आहे.

# राज्यात जागा वाटपाचे गुऱ्हाळ; साताऱ्यात महाविकास आघाडी एकसंध

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा : लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता काही दिवसात लागणार असून राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीत जागा वाटपाचे गुऱ्हाळ सुरूच आहे. अशातच सातारा मतदारसंघ आघाडीत कोणाकडे जाणार हे माहीत नसलेतरी नेते एकसंध असल्याचे दिसून येत आहे. यासाठीच बुधवारी आघाडीतील प्रमुख वरिष्ठ नेत्यांची बैठक साताऱ्यात होत असून यातून मतदारसंघाचा बराच उलगडा होणार आहे.

१९९९ ते २०१९ च्या २० वर्षातील सातारा लोकसभा निवडणुकीचा विचार करता आघाडी आणि युतीतच सामना झाला. एकवेळचा अपवाद वगळता दोन्ही गटात ज्या पक्षाकडे मतदारसंघ त्यांचाच उमेदवार निवडणुकीत उतरला. पण, आताची स्थिती वेगळी आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीत दोन गट पडले आहेत. यामुळे महायुतीततरी सातारा मतदारसंघ कोणाकडे हे अजुन स्पष्ट नाही. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीचा अजित पवार गट हे तिघेही सातारा मतदारसंघ पदरात पाडून घेण्यासाठी आसुसले आहेत. आजच्या स्थितीततरी कोणा एका पक्षाला मतदारसंघ मिळेल असे ठामपणे निश्चित नाही. यासाठी तीन पक्षांच्या वरिष्ठ नेतृत्वाची बैठक होऊन मतदारसंघ कोणाकडे राहणार हे ठरणार आहे.

तर महाविकास आघाडीत शरद पवार यांची राष्ट्रवादी साताऱ्यात उमेदवार उभा करणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे. पण, या राष्ट्रवादीचा उमेदवार कोण हे निश्चीत नाही. खासदार श्रीनिवास पाटील यांची लोकप्रियता आहे. पण, त्यांचे वयोमान पाहता ते यावेळी उमेदवार असणार का याविषयी साशंकता आहे. तर त्यांच्याऐवजी दुसरे ताकदीचे नाव आजतरी पवार गटाकडे नाही. त्यातच शरद पवार ऐनवेळी दुसऱ्या पक्षातून कोणी आले तर त्यांना उमेदवारी देणार का ? याविषयीही राजकीय चर्चांना उधाण आलेले आहे. अशातच महाविकास आघाडीची बैठक होत आहे. यामध्ये बऱ्याच गोष्टी स्पष्ट होणार आहेत.

साताऱ्यातील काँग्रेस कमिटीत ही बैठक होत आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, सतेज पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते प्रा. नितीन बानुगडे-पाटील यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्ष, परिवर्तनवादी आणि पुरोगामी विचारांच्या संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सातारा लोकसभा मतदारसंघ निवडणुकीविषयी बराच खल होणार आहे. यामध्ये साताऱ्याची निवडणूक कशी जिंकायची, काय रणनिती आखायची याविषयी चर्चा होऊ शकते. यामुळे या बैठकीकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. कारण, यातून आघाडी एकसंध असल्याचाही संदेश जाणार आहे. तसेच यातून निवडणुकीत फायदा घेण्याचाही हेतू असू शकतो.

महाविकास आघाडीची बैठक दीड महिन्यांपूर्वी साताऱ्यातील राष्ट्रवादी भवनमध्ये झाली होती. त्यानंतर आताची ही बैठक दुसरी असून निर्णायक ठरणार आहे. यासाठी आघाडीतील जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे साताऱ्याचा खासदार आघाडीचा करण्याचा विडाच एकप्रकारे उचलण्यात येणार असल्याचे चित्र आहे. तर काही दिवसांपूर्वीच काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सातारा मतदारसंघाची माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासाठी मागणी केलेली. या पार्श्वभूमीवर काँग्रेस कमिटीतच आघाडीची बैठक होत असल्याने यावर काय चर्चा होणार का ? हेही स्पष्ट होणार आहे.

महायुतीत सातारा मतदारसंघाचा तिढा आहे. तसेच माढाबाबतही वाद आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचीही बुधवारी मुंबईत बैठक होणार आहे. माढा मतदारसंघ राष्ट्रवादीच्या ताब्यात घेण्यासाठी विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांनी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. बुधवारच्या बैठकीत सातारा आणि माढा युतीत कोणाकडे राहणार हे जवळपास स्पष्ट होणार आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# सीमाभागातील तपासणी चौक्यांवर लक्ष केंद्रीत करा, पाच जिल्ह्यातील समन्वय बैठकीत निर्णय




**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : येत्या दोन महिन्यात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी आंतरराज्य तसेच आंतरजिल्ह्यातील सीमा चौक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांना अधिक मजबुती देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या समन्वय बैठकीत घेण्यात आला. निवडणुकीवर परिणाम होऊ शकणाऱ्या चलन, मद्य आणि इतर वस्तूंची अवैध वाहतूक रोखण्यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि बेळगाव प्रशासनाला दिल्या आहेत.

येथील रेसीडन्सी क्लब येथे झालेल्या या बैठकीत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आढावा घेतला. कोल्हापूरच्या सीमेला लागून असलेल्या कर्नाटक जिल्ह्यातील व लगतच्या इतर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी या चर्चेत भाग घेतला. निवडणूक आदर्श आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन होणार नाही याची खात्री करण्यासाठी दोन्ही राज्यातील व शेजारील जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण समन्वयासाठी सहमती दर्शवली.

कोल्हापूरात कर्नाटक, गोवा, सिंधूदुर्ग, सांगली व रत्नागिरी येथून मोठ्या प्रमाणात विविध साहित्य, वस्तू तसेच औद्योगिक वाहतूक होत असते. यामुळे सर्व सीमा भागात प्रमुख रस्त्यांसह आतील लहान मार्गावर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. ते म्हणाले, निवडणूक आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, कायमस्वरुपी चेकपोस्ट सोबतच सीमेवर तात्पुरत्या चेकपोस्ट उभ्या करा. यासाठी त्यांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्या. कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी जिल्ह्यातील विविध चेकपोस्टबाबत माहिती सादर केली. सांगलीचे जिल्हाधिकारी राजा दयानिधी यांनीही सादरीकरण केले. बेळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनीही या आढावा बैठकीत भाग घेतला.

प्रास्ताविक उप जिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेंडगे यांनी केले. निवासी उप जिल्हाधिकारी संजय तेली यांनी आभार मानले. बैठकीला सांगलीचे जिल्हाधिकारी राजा दयानिधी, कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, सांगलीचे पोलीस अधीक्षक संदिप घुगे उपस्थित होते. याशिवाय बेळगाव, सिंधुदूर्ग, रत्नागिरी येथील जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक ऑनलाईन उपस्थित होते. याशिवाय सीमाभागातील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, संबंधित पोलिस अधिकारी, अपर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

मालवाहतूक ट्रकच्या हालचालींवर लक्ष

निवडणुकीवर प्रभाव टाकणाऱ्या मालाची वाहतूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रकच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यावर कारवाई करण्याचा निर्णय यावेळी घेतला. ही वाहतूक रोखण्यासाठी सीमा भागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या समन्वयासाठी व्हॉट्स प ग्रुप करण्यात येणार आहे. ग्रामीण भागात धावणाऱ्या वाहनांची प्रत्येक ठिकाणी कसून तपासणी करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

## द्राक्ष महोत्सवाचे सांगलीत ७ व ८ मार्च रोजी आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सांगली जिल्ह्यातील प्रयोगशील आणि प्रगतशील द्राक्ष शेतकऱ्यांनी पिकवलेल्या द्राक्षांचे प्रदर्शन द्राक्ष महोत्सवाच्या निमित्ताने भरवले जावे, द्राक्ष फळासंबंधी ग्राहकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी, द्राक्ष खाल्ल्याने होणारे फायदे यासंबंधी लोकांमध्ये माहिती पोहचावी यासाठी द्राक्ष महोत्सवाचे आयोजन कच्छी जैन भवन, राम मंदिर चौक सांगली येथे दि. ७ व ८ मार्च रोजी करण्यात येत आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार यांनी केले आहे.



कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघ सांगली, कृषि उत्पन्न बाजार समिती सांगली, बेदाणा असोसिएशन, कृषि निविष्ठा विक्रेते व उत्पादक असोसिएशन यांच्या सयुंक्त विद्यमाने सांगली जिल्ह्यामध्ये द्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. सांगली जिल्हा हा द्राक्ष पिक प्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. सांगली जिल्ह्याने संपूर्ण देशात द्राक्ष उत्पन्नात चांगल्या दर्जाचे नाव कमावले आहे. द्राक्ष महोत्सवाच्या निमित्ताने महाशिवरात्र द्राक्ष दिन म्हणून देशभरात दरवर्षी साजरा व्हावा आणि या दिवशी प्रत्येक घरोघरी आवडीने द्राक्षे आणि बेदाणा खाल्ली जावीत. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना चांगला बाजारभाव मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणे हे सर्व शासकीय कृषी विभाग, कृषी निविष्ठा उत्पादन विक्रेते यांचे दायित्व आहे. भविष्यात द्राक्ष पिक क्षेत्र टिकण्यासाठी व द्राक्ष फळाची मागणी वाढण्यासाठीचे सामाजिक हित लक्षात घेता सांगली जिल्ह्यामध्ये कच्छी जैन भवन, राम मंदिर चौक सांगली, या ठिकाणी द्राक्ष महोत्सव दिनांक ७ व ८ मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत महाशिवरात्रीनिमित द्राक्ष दिन साजरा करण्यात येत आहे.

द्राक्ष खाल्ल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढते, पचन शक्ती सुधारते, थकवा दूर होण्यास मदत होतो. ९द्राक्ष महोत्सवामध्ये द्राक्ष बागायतदार ते थेट ग्राहक विक्री करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी महाशिवरात्री निमित्त साजरा होणाऱ्या द्राक्ष दिनास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. कुंभार यांनी केले आहे.

## विशेष मोतिबिंदू शस्त्रक्रिया मोहीमेला ९ मार्चपर्यंत मुदतवाढ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुंबई : राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत राज्यभरात विशेष मोतिबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेला ९ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. शासकीय रुग्णालय, मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था रुग्णालय येथे विनामूल्य मोतिबिंदू शस्त्रक्रिया केल्या जाणार असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

जास्तीत जास्त रुग्णांना या मोहिमेचा लाभ घेता यावा, यासाठी आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी या मोहिमेला ९ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या मोहिमेसाठी शासकीय आरोग्य संस्थांसह, अशासकीय स्वयंसेवी संस्था तसेच खासगी संस्थांचे सहकार्य घेण्यात येत आहे. याविषयी किंवा इतर आरोग्य विषयक सल्ला घेण्यासाठी नागरिकांनी १०४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. पंधरवड्यात १ लाख शस्त्रक्रिया करण्याचे लक्ष विभागाने ठेवले आहे.

या मोहिमेंतर्गत शस्त्रक्रिया करण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हानिहाय नियोजन केले असून संबंधित आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. केंद्र शासनामार्फत 'राष्ट्रीय नेत्र ज्योती अभियान' ही विशेष मोहीम जून, २०२२ पासून राबविण्यात येत आहे. या मोहिमेत ५० किंवा त्याहून अधिक वयाच्या लोकांमध्ये अंधत्व आणि एसव्हीआय कारणीभूत असलेल्या मोतिबिंदू शस्त्रक्रियांचा अनुशेष पूर्णपणे भरून काढण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. आरोग्य विभागाच्या या मोहिमेमुळे नागरिकांना नि:शुल्क शस्त्रक्रिया करून आपली दृष्टी कायम ठेवता येणार आहे. राष्ट्रीय नेत्र ज्योती अभियान अंतर्गत २०२२ ते २०२५ या तीन वर्षात २७ लाख मोतिबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट आहे.

सन २०२२-२३ मध्ये राज्यात मोतिबिंदू शस्त्रक्रियेचे ११२.५१ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात डिसेंबर, २०२३ पर्यंत एकूण उद्दिष्टाच्या ६७.३० टक्के मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मोतिबिंदू शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता दि. १९ फेब्रुवारी ते दि.०४ मार्च २०२४ या कालावधीत जिल्हा स्तरावर 'विशेष मोतिबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात येत असून मोहिमेकरिता ९ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

## सांगलीच्या तरुणाकडून दोन कोटींचे सोने जप्त, 'डीआरआय'ची कारवाई

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई : सोन्याच्या तस्करी प्रकरणात केंद्रीय महसूल गुप्तचर यंत्रणेच्या (डीआरआय) अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील एका तरुणाला उत्तर प्रदेशातील लखनौ येथे अटक केली आहे. त्याच्याकडून दोन कोटी नऊ लाख रुपयांचे सोने जप्त करण्यात आले आहे. योगेश राजेंद्र गायकवाड असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. तो सांगली जिल्ह्यातील रहिवासी आहे.

प्राप्त माहितीनुसार, दुबईतून तस्करीच्या मार्गे भारतात आलेले सोने उत्तर प्रदेशात विकण्याचे काम काही तरुण करत असल्याची माहिती 'डीआरआय'च्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. हे सोने घेऊन एक तरुण वाराणसी येथून लखनौला रस्तेमार्गे जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर 'डीआरआय'च्या अधिकाऱ्यांनी सापळा रचला. या रस्त्यावर सुलतानपूर येथे जाणाऱ्या वाहनांच्या तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांना हा तरुण सोन्यासह आढळून आला. अधिकाऱ्यांनी त्याला या सोन्याबद्दलच्या कागदपत्रांची विचारणा केली. मात्र, तो कोणतीही कागदपत्रे सादर करू शकला नाही. त्यामुळे त्याला अटक करण्यात आली आहे.

## जतमधील उमदी-माडग्याळ परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

उमदी : जत तालुक्यातील उमदी व उटगी, माडग्याळ परिसरात मंगळवारी दुपारी १ वाजून ४२ मिनिटांनी काही भागात भूकंप सदृष्य सौम्य धक्का जाणवला. सौम्य धक्याबरोबरच मोठा आवाज झाला. दुपारची वेळ असल्याने व शांतता असल्याने झालेला आवाज प्रकर्षाने जाणवला.

भूगर्भातून आवाज येताच लोक घरातून बाहेर पळाले. एकच पळापळ उडाली. पुर्व भागातील अनेक गावात हा मोठा आवाज आल्याने काही काळ भितीचे वातावरण पसरले होते. भूकंपाचा धक्का जाणवताच भूकंपाचा सौम्य धक्का असल्याने घाबरण्याचे कारण नाही, त्यामुळे लोकांनी गोंधळून जाऊ नये, असे आवाहन याबाबत प्रशासनाने केले आहे.

मंगळवारी वातावरणात २ ते ३ अंश सेल्सिअसने तापमानात वाढ झाली असल्याने हे धक्के जाणवत असल्याचे विज्ञानाच्या अभ्यासकांचे मत आहे.

## शरद पवार १३ मार्चला नाशिकमध्ये

### लोकसभा निवडणुकीची तुतारी फुंकणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नाशिक- अत्यंत सधन आणि प्रयोगिक शेतीत अग्रेसर असलेला नाशिक जिल्ह्यातील निफाड हा तालुका राजकीय दृष्ट्या देखील सजग आहे आगामी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे नेते शरद पवार याच मतदार संघात निवडणूकीच्या रणाला प्रारंभ होत असल्याची तुतारी फुंकणार आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या दृष्टीने नाशिक जिल्हा अत्यंत महत्वाचा असून निफाड तालुका हा शरद पवार यांना मानणारा आहे. कृषीच्या प्रयोगांना शरद पवार यांनी नेहमीच पाठबळ दिले आहे त्यातच सध्या तर कांदा निर्यात बंदीचा विषय गाजत आहे. निफाड तालुक्यातील लासलगाव ही आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ मानली जाते. या ठिकाणी राजकारण तापले आहे. त्यातच शेतमालाला भाव, अवकाळीचे नुकसान असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत असताना शरद पवार यांची अचूकपणे निफाडचीच निवड जाहिर सभेसाठी केली आहे.



शरद पवार हे या मतदार संघात शेतकरी मेळावा घेणार असले तरी खऱ्या अर्थाने ते निवडणूक रणांगणावर तुतारी फुंकणार आहेत. या सभेसाठी निफाड किंवा लासलगाव या पैकी एका जागेची निवड करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे नेते गोकूळ पिंगळे यांनी दिली.

## कासजवळ अपघातात साताऱ्यातील दोन तरुण ठार


**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा: साताऱ्याहून कासकडे कारमधून फिरण्यासाठी जात असताना कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव कार दुभाजकाला जोरदार धडकली. यात दोन तरुण जागीच ठार झाले तर तिघेजण गंभीर जखमी झाले. हा अपघात सोमवारी सकाळच्या सुमारास झाला.

अरहान फैजल शेख (वय १६, रा. गुरुवार पेठ, सातारा), सोहेल अन्सारी (१८, रा. बुधवार पेठ, सातारा) अशी जागीच ठार झालेल्या तरुणांची नावे आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, साताऱ्यातील पाच तरुण कारने कासला फिरण्यासाठी जात होते. कास येथील वुड्स रिसॉर्टजवळ हे तरुण पोहोचले असता चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार दुभाजकाला जाऊन जोरदार धडकली. हा अपघात इतका भीषण होता की, गाडीतील एक तरुण उडून रस्त्यावर फेकला गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर कारमधील चौघेही गंभीर जखमी झाले. यातील एकाचा जागीच मृत्यू झाला.

जखमी तिघांना काही नागरिकांनी तातडीने साताऱ्यातील खासगी रुग्णालयात दाखल केले.



घटनास्थळाचे दृश्य थरकाप उडविणारे होते. एका तरुणाचे डोके डांबरी रोडवर आपटल्याने त्याच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. यामुळे सर्वत्र रक्ताचा सडा पसरला होता. हा अपघात अतिवेगामुळे झाला असल्याचे समोर येत आहे. सातारा तालुका पोलिस ठाण्यात या अपघाताची अद्याप नोंद झाली नव्हती.

## लग्नाचा बहाणा करून फसवणूक करणाऱ्या टोळीतील सात अटकेत

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) : लग्नाचा बहाणा करून फसवणूक करणाऱ्या टोळीतील तीन पुरुष व नवरीसह चार महिलांना कुडाळ पोलिसांनी अहमदनगर, श्रीरामपूर, पंढरपूर, सातारा येथून ताब्यात घेत अटक केली आहे. संशयित टोळीने कुडाळ तालुक्यातील एकाचे लग्न लावून त्यानंतर नवरी पळून गेली. लग्नासाठी सुमारे १ लाख ४० हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी कुडाळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता.

कुडाळ पोलिस ठाण्यात ४२ वर्षीय तक्रारदार यांनी तक्रार दिली होती की, ते गेल्या चार वर्षांपासून लग्नाकरिता स्थळ पाहत होते. एक महिन्यापूर्वी अझिज नाईक (रा. माणगाव, ता. कुडाळ) व महेश पाटकर (रा. पाट दळवीवाडी, ता. कुडाळ) यांनी कुडाळ कोर्टाजवळील पाटेश्वर मंदिरात तक्रारदारास बोलावून अझिज नाईक याने चार पुरुष व महिलांना आणून मुलगी दाखवली. तिचे नाव रुपाली दत्ताजी पाटील असल्याचे सांगितले. तसेच, इतर आरोपींची ओळख त्या मुलीचे नातेवाईक म्हणून करून दिली. लग्नकार्यासाठी १ लाख ४० हजार रुपये तक्रारदार यांच्याकडून घेतले.

त्यानंतर २५ फेब्रुवारी रोजी हुमरमळा वालावल येथे रुपाली पाटील हिच्याशी धार्मिक पद्धतीने लग्न लावून दिले. २६ फेब्रुवारी रोजी ग्रामदेवतेच्या दर्शनासाठी तक्रारदार लग्न केलेल्या युवतीसह घरी आले. दुपारनंतर रुपाली पाटील ही घरातून कोणालाही न सांगता निघून गेली. त्यानंतर तक्रारदार यांनी कुडाळ पोलिस ठाण्यात येऊन तक्रार दिली.

या प्रकरणातील नवरी मुलीसह संशयित विशाल मच्छिंद्र थोरात ( ३४, रा. उंदीरगाव रस्ता, गोडेगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर,) तसेच माधुरी प्रभाकर केदारी उर्फ भारती मदन ठोंबरे (३२, रा. संजयनगर, सूतगिरणी गेट, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) , संतोष दौलू काकडे ( ३७, रा. शिरोली, ता. करवीर जि. कोल्हापूर), संतोष गणाजी जगदाळे (४०, रा. दहीवडी, ता. माण, जि. सातारा), ज्योती संतोष शेलार ( ४३, रा. ता. वाई, जि. सातारा), मंगल संजय महापुरे (४८, रा. हेर्ले, हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांना अहमदनगर, श्रीरामपूर, पंढरपूर, सातारा येथून ताब्यात घेतले आहे.

## मुंबई विमानतळावर पडकले १ कोटी ६० लाखांचे सोने

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई - गेल्या तीन दिवसात दहा स्वतंत्र प्रकरणात मिळून मुंबई विमानतळावरील सीमा शुल्क विभागाने एकूण १ कोटी ६० लाख रुपयांचे सोने पकडले आहे. या सोन्याचे वजन ३ किलो ३ ग्रॅम असून याचसोबत २ आयफोन देखील जप्त करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, फेब्रुवारी व मार्च महिन्यात मिळून आतापर्यंत २५ पेक्षा जास्त आयफोन सीमा शुल्क विभागाने जप्त केले आहेत.

दुबई, सिंगापूर, सौदी अरेबिया, फुकेट येथून आलेल्या काही परदेशी व भारतीय प्रवाशांकडून हे सोने अधिकाऱ्यांनी जप्त केले आहे. यापैकी फुकेटमधून येणाऱ्या एका विमानातील तस्करीचे प्रकरण इंडिगो कंपनीच्या कर्मचाऱ्याने अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिले. त्या प्रवाशाने हे सोने विमानातील सीटच्या खाली ठेवले होते. तर, अन्य प्रकरणात जे सोने आढळून आले ते प्रामुख्याने बिस्कीटांच्या पाकीटात, परिधान केलेल्या कपड्यांमध्ये, बॅगतेली कपड्यात, रुमालात, ट्रॉली बॅगेत बनावट कप्पे तयार करत ते लपविल्याचे तपासादरम्यान अधिकाऱ्यांना आढळून आले.

## यापेक्षा अधिक गलिच्छ काय असू शकतं

### सुप्रिया सुळेंची सणसणीत टीका, कुणाला केलं लक्ष्य?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या चर्चेत आहेत. लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांना बारामतीतून उमेदवारी मिळणे जवळपास निश्चित आहे. याच दरम्यान, त्यांच्या विरोधात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना तिकीट दिले जाईल अशी दाट शक्यता आहे. त्यामुळे यंदा बारामतीत पवार विरूद्ध पवार असा सामना पाहायला मिळू शकतो. असे असतानाच आज सुप्रिया सुळे यांनी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना, पवार कुटुंबातील फूट, खाजगी आयुष्यातील घटनांचे मुद्दे, नुकताच सादर झालेला राज्याचा अर्थसंकल्प आणि महायुतीतील अंतर्गत कलह यावर आपले रोखठोक मत मांडले.

देश आणि राज्य लोकशाहीकडून दडपशाहीकडे सध्या जात आहेत. कोणी कसे वागायचे हा ज्या त्या व्यक्तीचा वैयक्तिक प्रश्न आहे. ही लोकशाही आहे, त्यामुळे या लोकशाहीत चर्चा तर झालीच पाहिजे. वैचारिक प्रगल्भता ही वयानुसार तरी आलीच पाहिजे. पण राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना सभागृहाच्या गॅलरीमध्ये मंत्री आणि आमदारांमध्ये भांडणं होतात. यापेक्षा अधिक गलिच्छ काय असू शकते, अशा शब्दांत सुप्रिया सुळेंनी महायुतीतील अंतर्गत कलहावर मत मांडले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि पवार कुटुंबात कोणतीही फूट नाही. मला, शरद पवारांना, रोहित पवारांना कुणाच्याही खाजगी आयुष्याविषयी बोलण्याचा अधिकार नाही. कारण आम्ही लोकप्रतिनिधी असलो तरी आमच्या कुटुंबातील लोकांना त्यांचे खाजगी आयुष्य जगण्याचा आणि ते खाजगी ठेवण्याचा पूर्ण अधिकार आहे. आपण आपले वैयक्तिक आयुष्य आणि व्यावसायिक आयुष्य हे एकत्र करू शकत नाही. त्यामुळे आमच्या कौटुंबिक वेळेत ज्या काही गोष्टी होतात, त्या आम्ही सांगू शकत नाही, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.




मी लोकशाहीत काम करते. मी माझे वैयक्तिक संबंध कधीच लपवलेले नाहीत. माझे वैयक्तिक संबंध सगळ्याच पक्षाच्या लोकांसोबत असतात. पण मी लोकशाहीवर विश्वास ठेवणारी असल्याने माझे काही लोकांशी राजकीय आणि वैचारिक मतभेद आहेत. माझे कुणाशीही मनभेद नाहीत. लोकशाही आहे. प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार असतो. प्रत्येकाची एक स्टाईल आहे. लोकशाहीत मी सगळ्यांच्याच संपर्कात आहे. कारण मी लोकप्रतिनिधी आहे. विकासकामे किंवा इतर कामांसाठी चर्चा होतात, असेही सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

# देशमुख महाविद्यालयात पौष्टीक तृणधान्य कार्यशाळा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयामध्ये युनोने घोषित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष - २०२३' अंतर्गत 'राष्ट्रीय कृषी विकास योजना महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान' अंतर्गत आटपाडी तालुका कृषी विभाग व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय पौष्टिक तृणधान्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून मारुती कौलगे तालुका कृषी अधिकारी, आटपाडी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रशांत पाटील व रवींद्र घुटुगडे यांनी विद्यार्थ्यांना पौष्टीक तृणधान्यासंबंधी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले मंचावर उपस्थित होते.

तालुका कृषी अधिकारी मारुती कौलगे म्हणाले की, एकविसाव्या शतकातील मानवी जीवन हे अतिशय गतिमान झाले असून प्रत्येक माणसाने आपल्या संतुलित आहाराकडे आवर्जून लक्ष देणे गरजेचे आहे. शरीरास आवश्यक असणारी कर्बोदके, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, खनिजे, पाणी आहारामध्ये आवश्यक्यतेनुसार आपण घेतली पाहिजेत. ती घेतली जात नसल्यामुळे समाजामध्ये लठ्ठपणा, मधुमेह, बीपी अशा विविध आजारांच्या विळख्यात माणूस अडकला आहे. आपल्या अवतीभवती असणाऱ्या पौष्टिक तृणधान्याचा दररोजच्या आहारामध्ये अधिकाधिक उपयोग करणे महत्त्वाचे आहे. आहाराबरोबर आपला व्यायाम महत्त्वाचा आहे. गव्हाचे प्रमाण अधिक झाल्याने पचनक्रिया बिघडते व विविध आजार होतात. त्याकरिता सर्वांनी ज्वारी, बाजरी,नाचणी अशा तृणधान्यांचा उपयोग अधिकाधिक करणे गरजेचे असून, विद्यार्थ्यांनी फास्टफूड पासून परावृत्त होणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी मांडले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले म्हणाले, बदलत्या जीवनशैलीमध्ये अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांबरोबरच आहार, विहार आणि आचार खूप महत्त्वाचे असतात. निसर्गाने निर्माण केलेल्या त्या-त्या परिसरातील अन्नधान्याचे आपल्या आहारामध्ये उपयोग करणे गरजेचे आहे. ज्वारी, बाजरी ही तृणधान्य आवश्यक आहेत. आपला आहार नियंत्रित असेल तर आरोग्य व्यवस्थित राहू शकते. विद्यार्थ्यांनी तृणधान्य संबंधित आपल्या गावात प्रबोधन करणे गरजेचे आहे. यावेळी कृषी सहाय्यक रवींद्र घुटूगडे, आत्मा योजनेचे प्रशांत पाटील यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी तालुका कृषी विभागातील आर.एम. मेटकरी, पी. के.जठार, शिवाजी सूर्यवंशी, पी.एस.दराडे, गणेश सांगळे, एस.एल. कुंभार, बी.एल. पुजारी, बी.एम. वाघमोडे, एस.एस. ठोंबरे, एल.बी. माने हे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह पांडूरंग धादवड, नवनाथ जाधव, गणेश लिंगे, राजू पवार तसेच विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. हणमंत सावंत, सूत्रसंचालन प्रा. विजय शिंदे यांनी तर आभार डॉ. संदीप विभुते यांनी मानले.



**आटपाडी : येथील देशमुख महाविद्यालयात पौष्टीक तृणधान्य कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना कृषी अधिकारी मारुती कौलगे व मंचावर उपस्थित मान्यवर**

# कोल्हापूर महापालिकेचे १२६१ कोटींचे अंदाजपत्रक, नदी प्रदुषण रोखण्याच्या उपाययोजना भरीव तरतुद

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : जुन्या योजनांच्या पूर्ततेला प्राधान्य देणारे, नागरिकांच्या सूचनांचा आंतर्भाव असणारे, चांगल्या सुविधा देणारे, शहर स्वच्छतेला प्राधान्य देणारे तसेच महापालिकेच्या उत्पन्नवाढीला प्राधान्य देणारे, पंचगंगा नदी प्रदुषण रोखण्यावर भर देणारे कोल्हापूर महानगरपालिकेचे सन २०२४-२०२५ सालाचे नवीन अंदापत्रक मंगळवारी प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी जाहीर केले. या अंदाजपत्रकात घरफाळा, पाणीपट्टीमध्ये कसलीही वाढ करण्यात आली नसली तरी महापालिकेची मैदाने, दुकानगाळ्यांचे हस्तांतर, फिजिओथेरपी सेंटरच्या शुल्कात किंचित वाढ करण्यात आली आहे.



महापालिकेच्या अर्थसंकल्पीय अंदाजात अव्वल शिल्लकेसह महसूली व भांडवली अपेक्षित जमा रक्कम ८६८.०६ कोटी असून खर्च ८६७.८४ कोटी अपेक्षित आहे. विशेष प्रकल्पा अंतर्गत जमा ३४६.५१ कोटी अपेक्षित असून खर्च ३४४.३८ कोटी अपेक्षित आहे. वित्त आयोगाअंतर्गत एकूण ४६.५४ कोटी अपेक्षित असून खर्च ४६.०६ कोटी अपेक्षित आहे. तर एकत्रित महसुली, भांडवली व विशेष प्रकल्प, वित्त आयोग असे मिळून एकूण १२६१.११ कोटी इतके जमेचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आहे.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात राज्य तसेच केंद्र सरकारकडून प्राप्त झालेल्या निधीतून केल्या जाणाऱ्या विकास कामांची पूर्तता करण्याचा संकल्प नवीन अंदाजपत्रकात करण्यात आला आहे. त्यामध्ये महालक्ष्मी विकास आराखडा, रंकाळा तलाव सुशोभिकरण, नगरोत्थानमधील रस्ते, सरस्वती चत्रमंदिर, स्टेशनरोड येथील बहुमजली पार्कींग, अमृत योजना -२ मधील मलनिस्सारण व तलाव संवर्धन,शाहू समाधीस्थळ विकास, सार्वजनिक शौचायल, पंचगंगा नदी प्रदुषण रोखणे या विकास कामांचा समावेश आहे.

नागरिक व पर्यटकांच्या सोयीसाठी सार्वजनिक टॉयलेट शोध प, सर्व विभागात ऑनलाईन पैसे स्वीकारण्याची सुविधा, एमपीएससी परीक्षार्थीसाठी मुलाखतीचे प्रशिक्षण वर्ग सुरु करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता ४३ एमएलडी पर्यंत वाढविणे, ग्रीनपीस विकसीत करणे, कचरा प्रकल्पावर बफरझोन निर्माण करणे, शहरातील कचरा उचलण्यासाठी ४० टोटिपर रिक्षा, १२ ट्रॅक्टर ट्रॉलीज, बारा स्वीपींग मशिन खरेदी अशा नवीन कामांचा समावेश या अंदाजपत्रकात करण्यात आला आहे.

# मनमोहन सिंग नेतृत्वातलं सरकार मुकं, बहिरं, आंधळं होतं; नितीन गडकरींची टीका

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नागपूर : लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. अशात भाजपाने निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. नागपूरमध्ये झालेल्या भायुमोच्या संमेलनात नितीन गडकरींनी काँग्रेसवर टीकेची तोफ डागली आहे. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वातलं सरकार आंधळं, बहिरं आणि मुकं होतं अशी टीका त्यांनी केली आहे.

काय म्हणाले नितीन गडकरी?

१९४७ ला पंडित नेहरू हे देशाचे पंतप्रधान झाले. त्यांनी गरीबी हटवणार म्हटलं होतं. त्यानंतर इंदिरा गांधींनी गरीबी हटाव हा नारा दिला. त्यावेळी गरिबी हटली नाही. त्यानंतर राजीव गांधी आले, त्यांनीही हाच नारा दिला होता. त्यांच्यानंतर सोनिया गांधींच्या नेतृत्वात मनमोहन सिंग आले त्यांनीही हाच नारा दिला. एक असं सरकार दिल्लीत होतं, ज्या सरकारला डोळे होते पण दिसत नव्हतं, तोंड होतं पण बोलू शकत नव्हतं, कान होते पण ऐकू शकत नाही. मनमोहन सिंग सरकार हे मुकं, बहिरं आणि आंधळं होतं. अशी टीका गडकरींनी केली आहे.

नितीन गडकरींकडून मोदी सरकारचं कौतुक

नमो रोजगाराच्या माध्यमातून नितीन गडकरी यांनी मोदी सरकारच्या कार्यकाळाचं कौतुक आहे. मोदी सरकारला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. काँग्रेसच्या कार्यकाळाचे ६५ वर्षे आणि मोदींनी १० वर्षांत केलेला विकास याची तुलना करुन बघा. तुम्हाला कळेल मागच्या दहा वर्षांत उत्तम काम झालं आहे. हायवे, रस्ते, पोर्ट सगळ्या ठिकाणी तुम्हाला बदल दिसेल. नीती आयोगाने त्यांच्या अहवालात म्हटलं आहे की २५ टक्के गरीब हे दारिद्र्यरेषेच्या बाहेर आले आहे. साडेचार कोटी लोकांनी बँकेत खातं उघडलं आहे. आपल्या युवकांना माहीत असेल आम्ही जेव्हा मिहान प्रकल्प आणला तेव्हा शरद पवार आणि काँग्रेस या प्रकल्पाला विरोध दर्शवत होते. मात्र मिहानमध्ये आता विदेशी गुंतवणूक झाली आहे. आता ६८ हजार लोकांना रोजगार मिळाला आहे.

आत्मनिर्भर भारताच्या दिशेनेच आपली वाटचाल

युवकाच्या हाताला काम, शेतकरी कल्याण, उत्तम रुग्णालयं, उत्तम विद्यापीठं, उत्तम मार्ग, उत्तम शाळा या सगळ्या आम्ही उभ्या करत आहोत. सबका साथ सबका विकास या मंत्रानेच आम्ही पुढे चाललो आहोत. आज विदर्भात शेतकरी आत्महत्या करत नाहीत. कारण आपल्या सरकारने इथले बंद पडलेले सिंचन प्रकल्प आपण सुरु केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हे स्पष्ट केलं आहे की आपल्याला आत्मनिर्भर व्हायचं आहे. सध्या आपली वाटचाल त्याच दिशेने सुरु आहे असंही गडकरी आपल्या भाषणात म्हणाले. तसंच मोदी सरकारचं कौतुक केलं आहे.

# विकासकामांची माहिती देण्यासाठी फलकावर दिला क्यूआर कोड

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर: आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांचे दौरे सुरू झाले असून मतदारसंघात भरघोस निधी आणून नेते मंडळी विकासकामांचा नारळ फोडत आहेत. खासदार धैर्यशील माने यांनी हातकणंगले मतदारसंघात विकासकामांची माहिती देण्यासाठी फलक उभारले आहेत. याफलकावर एक क्युआर कोड देण्यात आला होता. हा क्युआर कोड स्कॅन करताच सर्व विकासकामांची माहिती नागरिकांनी मिळणार होती. मात्र झालं भलतच.. कोड स्कॅन करताच भलतीच वेबसाईट ओपन होत आहे. यामुळे सोशल मीडियावर खासदारांना ट्रोल केले जात आहे.

कोल्हापुरात शिवसेना शिंदे गटाच्या दोन्ही विद्यमान खासदारांनी आतापासूनच गावोगावी प्रचाराला सुरुवात केली आहे. हातकणंगले लोकसभा मतदारसंघात खासदार धैर्यशील माने यांनीही मोर्चेबांधणी सुरु केली आहे. आपल्या कार्यकाळात आपण मतदार संघासाठी किती निधी आणला नी किती विकास कामे केली याचा चढता आलेख नागरिकांना दाखवण्यासाठी त्यांनी एक नामी शक्कल लढवली.

सध्या डिजिटल युग असल्याने त्यांनी आपण केलेल्या विकासकामांची माहिती देणाऱ्या फलकावर माहिती जाणून घेण्यासाठी जो क्यूआर कोड दिला आहे. तो फेक असल्याची बाब समोर आली आहे. माने यांच्याच मतदारसंघातील काही तरुणांनी क्यूआर कोड स्कॅन केला, मात्र त्यानंतर वेगळीच वेबसाईट उघडत असल्याचे निदर्शनास आले आहे. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल ही झाला आहे.




या प्रकारानंतर ज्या ज्या पोस्टर वर हे क्युआर कोड लावले होते ते आता लपवण्याची वेळ आली आहे. अनेक भागात त्या कोडला आता झाकलेले पाहायला मिळत आहेत. खासदारांनी निधी किती आणला नी कामे किती झाली यापेक्षा नागरिकांमध्ये या फेक कयुआरकोड प्रकरणाची चर्चा मात्र जोरदार रंगलेली पाहायला मिळत आहे.


## जाहीर टेंडर नोटीस २०२३-२४

ग्रामपंचायत राजेवाडी ता-आटपाडी-जि-सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून मोहोरबंद निविदा ब-१ व दर पत्रक मागणी करारावर मागविनेत येत आहेत.तरी खालील नमूद केलेल्या कामानुसार दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमधील निविदा मागणी अर्ज दिलेनंतर निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत दिले जातील. मुदतीमध्ये आलेल्या निविदेचाच फक्त विचार केला जाईल.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखा शीर्षक | ज्या दर सूचीवर आधारित आहे ते वर्ष | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्रकार | निविदा फार्म फी रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये १% | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा सिकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे राजेवाडी ता. आटपाडी येथे गावठाण मातंग गल्ली रस्ता काँक्रिटीकरण करणे | अनु.जाती व नव बौध्द वस्तीचा विकास करणे. | २०२३-२४ | ७०००००/- | ब -१ | २००/- | ७०००/- | ६-३-२०२४ | १३-३-२०२४ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | ओपन |

१) संपूर्ण भरलेली निविदा सांक्षाकिंत प्रतीसह दोन लिफाफा पध्दतीत सिलबंद लखोटयासह ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जमा करावे. लिफाफा क्र. १ मध्ये जि.प. नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅन कार्ड व आयकर विवरण पत्र, अटी व शर्ती मान्य असलेचे हमीपत्र, बयाणा रक्कम चलन (ऑनलाईन RTGS /NEFT / DD सह सादर करावे. सांगली जिल्हा म.सह.बँक शाखा-राजेवाडी खाते नं. १७००५०९००००४७२ ) कामाचा अनभुव दाखला, इ. सर्व कागदपत्रे असावित. २) लिफाफा क्र. २ मध्ये बी १ फॉर्म ३) प्राप्त निविदा दि. १४/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडणेत येईल. ४) सदर निविदा स्विकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे. कामासंबंधीची सर्व माहिती कार्यालयीन वेळेत मिळेल.

ठिकाण:- ग्रामपंचायत राजेवाडी ता. आटपाडी

XXX
ग्रामसेवकग्रामपंचायत राजेवाडी
ता. आटपाडी जि. सांगली

XXX
सरपंच ग्रामपंचायत राजेवाडी
ता. आटपाडी जि. सांगली



## जाहीर टेंडर नोटीस २०२३-२४

ग्रामपंचायत उंबरगाव ता-आटपाडी-जि-सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून मोहोरबंद निविदा ब-१ व दर पत्रक मागणी करारावर मागविनेत येत आहेत.तरी खालील नमूद केलेल्या कामानुसार दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमधील निविदा मागणी अर्ज दिलेनंतर निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत दिले जातील. मुदतीमध्ये आलेल्या निविदेचाच फक्त विचार केला जाईल.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखा शीर्षक | ज्या दर सूचीवर आधारित आहे ते वर्ष | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्रकार | निविदा फार्म फी रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये १% | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा सिकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे. उंबरगाव येथे मागासवर्गीय वस्ती अंतर्गत वितरण व्यवस्था करणे. | १५ वा वित्त आयोग | २०२३-२४ | ६०३०५/- | ब -१ | २००/- | ६०३/- | ६-३-२०२४ | १२-३-२०२४ वेळ १२.०० वाजे पर्यत | ६ महिने | सुभे |
| २ | मौजे. उंबरगाव येथे पाणीपुरवठा पाईप लाईन व वाल दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | २०२३-२४ | ५७३०४/- | ब -१ | २००/- | ५७३/- | ६-३-२०२४ | १२-३-२०२४ वेळ १२.०० वाजे पर्यत | ६ महिने | सुभे |
| ३ | मौजे. उंबरगाव येथे धडसवाडी ते जि.प.शाळा धडसवाडी पर्यंत वितरण व्यवस्था करणे. | १५ वा वित्त आयोग | २०२३-२४ | १००७११/- | ब -१ | २००/- | १००७/- | ६-३-२०२४ | १२-३-२०२४ वेळ १२.०० वाजे पर्यत | ६ महिने | सुभे |

१) संपूर्ण भरलेली निविदा सांक्षाकिंत प्रतीसह दोन लिफाफा पध्दतीत सिलबंद लखोटयासह ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जमा करावे. लिफाफा क्र. १ मध्ये जि.प. नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅन कार्ड व आयकर विवरण पत्र, अटी व शर्ती मान्य असलेचे हमीपत्र, बयाणा रक्कम चलन (ऑनलाईन RTGS /NEFT / DD सह सादर करावे. ) कामाचा अनभुव दाखला, इ. सर्व कागदपत्रे असावित. २) लिफाफा क्र. २ मध्ये बी १ फॉर्म ३) प्राप्त निविदा दि. १२/०३/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता उघडणेत येईल. ४) सदर निविदा स्विकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे. कामासंबंधीची सर्व माहिती कार्यालयीन वेळेत मिळेल.

ठिकाण:- ग्रामपंचायत उंबरगाव ता. आटपाडी

XXX
ग्रामसेवकग्रामपंचायत उंबरगाव
ता. आटपाडी जि. सांगली

XXX
सरपंच ग्रामपंचायत उंबरगाव
ता. आटपाडी जि. सांगली


# बनावट पीयुसी प्रमाणपत्रांचे रॅकेट, अपघातग्रस्त वाहन कळंबीत, विम्यासाठी अहमदनगरातून काढले प्रमाणपत्र

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : धूर तपासणी प्रमाणपत्रांमध्ये बोगसगिरी करणारी पीयुसी केंद्रे शोधून त्यांच्यावर कारवाईचे आदेश परिवहन आयुक्तांनी दिले होते, पण त्यानंतरही बोगसगिरी सुरुच असल्याचे स्पष्ट झाले आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून बोगस प्रमाणपत्रे दिली जात असल्याचे कळंबी (ता. मिरज) येथील अपघातानंतर स्पष्ट झाले आहे.

कळंबी येथे शिरीष आमसिद्ध खंबाळे (वय २४, रा. भोसे, ता. मिरज) हा पोलिस भरतीची तयारी करणारा तरुण २५ फेब्रुवारीरोजी पीकअप जीपच्या धडकेत ठार झाला होता. विश्वजित मोहिते, प्रथमेश हराळे आणि प्रज्वल साळुंखे हे तरुण गंभीर जखमी झाले होते. रत्नागिरी - नागपूर महामार्गावर कळंबी गावाजवळ सकाळी आठ वाजता अपघात झाला. पंढरपूरकडून भरधाव वेगाने सांगलीकडे येणाऱ्या मालवाहू जीपने (एमएच १७ सीव्ही ०१४१) दोन दुचाकींना मागून धडक दिली होती.

या गाडीचे पीयुसी प्रमाणपत्र अद्यावत नव्हते. पोलिस पंचनाम्यावेळी हे प्रमाणपत्र दिले नाही, तर गुन्हा दाखल होऊ शकतो, विम्याची भरपाई मिळू शकत नाही हे वाहन मालकाच्या लक्षात आले. त्याने बोगसगिरी करुन तातडीने प्रमाणपत्र बनवले. अपघात मिरजेपासून सात-आठ किलोमीटर अंतरावर झाला होता. गाडी दिवसभर तेथेच थांबून होती. तरीही तिचे पीयुसी प्रमाणपत्र थेट अहमदनगर जिल्ह्यातील अकोला येथून काढण्याची करामत मालकाने केली. अपघाताच्या दिवशी दुपारी तीन वाजता



हे प्रमाणपत्र निघाले आहे. त्यावर जीपचे छायाचित्रदेखील आहे.

ही गाडी अपघाताच्या ठिकाणाहून अकोल्याला अवघ्या सात तासांत कशी गेली? हा प्रश्न पोलिसांना पंचनाम्यावेळी पडल्याचे दिसून येत नाही. मिरज ग्रामिण पोलिसांनी प्रदूषण प्रमाणपत्र पाहिले, पण त्याचदिवशी ३५० किलोमीटर अंतरावरील अकोल्यातून पीयुसी प्रमाणपत्र कसे निघाले? याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

गाडीच्या मालकाने नंबर प्लेटचे छायाचित्र मोबाईलवरुन अकोले येथील पीयुसी केंद्राला पाठविले. केंद्रचालकाने आरटीओच्या पोर्टलवर हेराफेरी करुन बोगस प्रमाणपत्र तयार केले. काही मिनिटांतच मालकाला मोबाईलवर पाठवले. त्याची प्रिंट काढून पंचनाम्यासाठी सादर करण्यात आली. ही हेराफेरी सर्वत्र सर्रास सुरु आहे. लोकमतने यासंदर्भात वृत्तमालिका प्रसिद्ध केल्यानंतर परिवहन आयुक्तांनी बोगस पीयुसी केंद्रांना शोधून कारवाईचे आदेशही दिले होते, पण आरटीओ अधिकाऱ्यांनी हा आदेश फाट्यावर मारल्याचे स्पष्ट होत आहे.